महाराष्ट्र शासन

# उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन), पुणे.



| | | |
|---|---|---|
| दूरध्वनी क्र. (वै) (०२०) २६०५८५२५ | कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक (०२०) २६०५८३७३ (०२०) २६०५८९१२ | उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन), ८, केनडी रोड, नायडू हॉस्पीटल कंपाऊंड, पुणे- ४११ ००१ यांचे कार्यालय. कार्यालयीन फॅक्स क्रमांक : (०२०) २६०५८३७८ ई-मेल आयडी : ddhs.transport@gmail.com |
| आरोग्य सेवा | | |



| | |
|---|---|
| **महत्वाचे व तातडीचे** | जाक्र.आसेप/तांत्रिक११८-IV/ कापडी पिशव्या दरपत्रक २०१७-१८/ ६९६ /२०१८, दिनांक :- २० जानेवारी २०१८. |

प्रति,

------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

**विषय :- कार्यालयीन जुने दस्ताऐवज, अभिलेख, नस्ती व नोंदवहया व्यवस्थितपणे जतन करुन ठेवण्यासाठी पिशव्या (जाड ताडपत्रीचे कापड असलेले, चेन व पारदर्शक कप्पा असलेल्या), साठी दरपत्रक सादर करणेबाबत...**

कार्यालयीन जुने दस्ताऐवज, अभिलेख, नस्ती व नोंदवहया व्यवस्थितपणे जतन करुन ठेवण्यासाठी पिशव्या (जाड ताडपत्रीचे कापड असलेले, चेन व पारदर्शक कप्पा असलेल्या) चे विर्निदेश(Specification's) खालील प्रपत्रात नमूद करण्यात येत आहेत. यानुसार पिशव्यांचे सर्व करांसह **प्रतिनग दर** या कार्यालयास आपण सादर करावयाचे आहेत. सदर सर्वकर समावेशक दर आपले संस्थेच्या लेटरहेडवर **दिनांक २९ जानेवारी २०१८ रोजी दुपारी** २.०० पर्यंत सिलबंद लिफाफयामध्ये या कार्यालयास सादर करावेत. सिलबंद लिफाफयावर "**पिशव्या (जाड ताडपत्रीचे कापड असलेले, चेन व पारदर्शक कप्पा असलेल्या) साठी दरपत्रक**" असा स्पष्ट उल्लेख करावा.

- प्रपत्र -

| आवश्यक साहित्याचे नांव व विवरण | विनिर्देश |
|---|---|
| **पिशव्या** (जाड ताडपत्रीचे कापड असलेले, चेन व पारदर्शक कप्पा) | **१) २७ इंच लांबी x १८ इंच रुंदी x (१८ ते २०) इंच उंची.** <br> **२) पिशवीचे कापड हे जाड ताडपत्रीचे असावे.** <br> **३) ६ इंच x ६ इंच पारदर्शक कप्पा असावा.** |

कृ.मा.प/-

**दरपत्रके सादर करणेविषयीचा तपशिल व कालावधीः**

| अ.क्र. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १ | दरपत्रके सादर करण्यासाठीचा कालावधी | दि. २० जानेवारी २०१८ ते २९ जानेवारी २०१८ दुपारी २.०० वाजेपर्यत. |
| २ | दरपत्रके उघडण्यासाठीचा दिनांक व वेळ | दि. २९ जानेवारी २०१८. रोजी दुपारी ३.०० वाजता अथवा लगतचे कामकाजाचे दिवशी |

प्राप्त संस्थांची दरपत्रके उघडण्याची वेळ ही **शक्यतो दिनांक २९ जानेवारी २०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता** अथवा लगतचे कामकाजाचे दिवशी राहील . सदर दरपत्रके उपस्थित असलेल्या संबंधित संस्थांचे प्रमुख अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींचे समक्ष उघडण्यात येतील.

**दरपत्रके सादर करणेबाबतच्या सूचना :**

१) दरपत्रकासोबत एकल निविदा असणेबाबत तसेच खरेदी प्राधिकाऱ्यासोबत कोणत्याही प्रकारचा हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत "निविदाकारांची हमी" चे विहीत नमून्यातील हमीपत्र.

२) पुरवठादारांची कायदेशीर बाबींतर्गत संबंधित व्यावसायाविषयीची सर्व प्रकारांच्या करांसाठीची नोंदणी असणे आवश्यक असुन सदर प्रमाणपत्रे दरपत्रकासोबत सादर करावीत. (उदा. CGST/SGST/IGST इ.आवश्यकतेनुसार लागू असणारे)

३) दरपत्रके ही संस्थेच्या लेटरहेडवर असावीत तसेच नमुना प्रपत्रामध्ये दर नमूद करुन सदरील लेटरहेड हे सही व शिक्क्यासह या कार्यालयास सादर करावीत.

४) संस्थेच्या लेटरहेडवर CGST/SGST/IGST नंबरचा उल्लेख असावा.

५) अटी व शर्तीसह सादर करण्यात आलेल्या दरपत्रकाचा विचार करण्यात येणार नाही.

६) खाडाखोड असलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत.

७) विहित मुदतीनंतर प्राप्त झालेली दरपत्रके विचारात घेतले जाणार नाहीत.

८) दर पत्रकासोबत पॅन कार्डची छायांकित प्रत बंधनकारक आहे.

९) दर सादर करावयाच्या यादीमध्ये कुठल्याही प्रकारचा फेरफार केल्यास सदर दरपत्रक तात्काळ रदद् करण्यात येईल.

१०) दरपत्रकातील दर हे लागू असलेल्या करांसहित असावेत.

११) वरील साहित्याची दरपत्रके उपसंचालक, आरोग्य सेवा(परिवहन), पुणे या नावे सीलबंद लिफाफ्यात पाठवावीत.

१२) दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचे संपुर्ण अधिकार हे या कार्यालयाने राखून ठेवलेले आहेत याची कृपया नोंद घ्यावी.

उपसंचालक,
आरोग्य सेवा (परिवहन),
पुणे -४११ ००१.

प्रपत्र - अ

## निविदाकारांनी द्यावयाच्या हमीपत्राचा नमूना

मी/आम्ही/आमची संस्था या पत्रान्वये हमी देतो की, आमचा खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंधाचा संघर्ष नाही तसेच मी/आम्ही/आमची संस्था सदर कामासाठी फक्त एकच निविदा सादर केलेली आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या अन्य संस्थांमध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही.

दिनांक :-

निविदाधारकाची सही व संस्थेचा शिक्का